www.rajdand.com
सातारा, रविवार
12.02.2023
पृष्ठ : ४ | मूल्य : ₹ ४.०० | माघ कृ.७
/rajdandlive
Reg.No. MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

इलेसियम क्लब्ससोबत सहयोगाने पुण्यात जगातील अग्रगण्य टेनिस अकॅडमी पीटर बर्वाश इंटरनॅशनलचे उद्घाटन

पान ४ वर..



# रत्नागिरीचे पत्रकार शशिकांत वारिसे यांची हत्या नियोजनपूर्वक

## सबळ पुरावे असल्याचा पालकमंत्री उदय सामंत यांचा दावा

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

**रत्नागिरीचे पत्रकार शशिकांत वारिसे यांच्या मृत्यूनंतर देशात खळबळ उडाली आहे. आरोपी पंढरीनाथ आंबेरकर हा रिफायनरी प्रकल्पाचा समर्थक असल्याने या संपूर्ण प्रकरणाला आता एक वेगळाच रंग आला आहे. या संदर्भात रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांच्याशी संवाद साधला असता ते म्हणाले आहेत की, पत्रकार शशिकांत वारिसे यांची हत्या नियोजनपूर्वक करण्यात आली असून याप्रकरणी सबळ पुरावे असल्याचा दावा त्यांनी केला आहे.**

उदय सामंत यांनी सांगितलं की, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आपण मानतो त्यानं टीका केली किंवा आपल्या विरोधात लिहिलं म्हणून रागाने काही करावं, असा काही नियम नाही आणि कोणाला असं वाटूही नये. याप्रकरणी जेव्हा मी माहिती घेतली तेव्हा असं कळलं की, ज्या व्यक्तीने हा गुन्हा केला आहे त्याविरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आला. ते म्हणाले, पालकमंत्री म्हणून मी पोलीस तपासाची जी माहिती घेतली आहे, त्यात ३०२ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांकडे सबळ पुरावे आहेत. आरोपीने देखील गुन्हा कबूल केला असल्याचं पोलिसांनी सामंत यांनी सांगितलं असल्याचं ते म्हणाले आहेत.





उदय सामंत म्हणाले की, ''आरोपीने ही हत्या कशी केली, याबाबत पोलिसांना सांगितलं आहे. आरोपीने ही हत्या नियोजनपूर्वक केली आहे.'' ज्यांनी ही हत्या होताना पाहिली आहे, त्यांनी पुढे येऊन पोलिसांना याबाबत माहिती द्यावी, असं आवाहन त्यांनी केलं आहे. ते म्हणाले आहेत की, साक्षीदाराने घाबरण्याचे कारण नाही. कोणत्याही दबावात न राहता पुढे येऊन पोलिसांना सहकार्य करावे. साक्षीदाराला हे प्रकरण निकाली लागूपर्यंत पोलीस संरक्षण देण्यात येईल, असंही ते म्हणाले आहेत.

दरम्यान, शशिकांत वारिसे यांच्या हत्याप्रकरणी अटक करण्यात आलेला आरोपी पंढरीनाथ आंबेरकर हा रत्नागिरी जिल्ह्यातल्या राजापूर तालुक्यातील कुंभवडे या गावचा रहिवासी. सुरुवातीच्या काळात छोटासा आंबा व्यापारी असलेला पंढरीनाथ आंबेरकर २०१७ सालानंतर मात्र आर्थिकदृष्टीने सक्षम झाला. कोकणात नाणार रिफायनरी प्रकल्पाची घोषणा झाली आणि त्यानंतर त्याने काही जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु केले. स्वतः देखील काही जमिनी खरेदी केल्या. यामध्ये त्याला आर्थिक नफा चांगलाच झाला. दरम्यानच्या काळात टूर्स अँड ट्रॅव्हल्स आपला व्यवसाय सुरु केला आणि वाढवला. नाणार रिफायनरी प्रकल्प रद्द झाला आताची घोषणा बारसू आणि सोलगाव येथे झाली. या ठिकाणी देखील आंबेरकर याने जमीन खरेदी विक्रीचे व्यवहार सुरु केले. त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

# वालचंदनगर इंडस्ट्रीजच्या फौंड्री डेप्युटी जनरल मॅनेजरला अज्ञात व्यक्तीची फोनवरून धमकी

**कोरेगाव : प्रतिनिधी**

सातारारोड, ता.कोरेगाव येथील वालचंदनगर इंडस्ट्रीजच्या फोंड्री डेप्युटी जनरल मॅनेजरला अज्ञात व्यक्तीने फोन वरून धमकी दिल्याची खळबळजनक घटना घडली आहे. सरत बाबू रायडी असे त्यांचे नाव आहे दरम्यान पोलिसांनी या धमकीची दखल घेऊन तपास सुरू केला असून धमकीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही.

याबाबत अधिक माहिती अशी की, सरत रायडी यांनी कंपनीत दि. ७ ऑक्टोबर २०२२ पासून काम सुरू केले. दि. १४ जानेवारी २०२३ रोजी रात्री ८ वाजून ४० मिनिटानी ते कंपनीच्या कॉलनीमध्ये वास्तव्यास असलेल्या बंगल्याची बेल दोन अज्ञात व्यक्तीनी वाजवली. त्यानंतर रायडी हे आतील दरवाजा उघडून दुसऱ्या दरवाजाच्या जळीतून त्या अज्ञात व्यक्तीशी बोलू लागले. त्या अज्ञात व्यक्तींनी रायडी यांना जेवणाची विचारपूस केली तसेच त्यांनी आम्हाला तुमचेशी कामगारांच्या विषयावर बोलायचे आहे असे म्हणाले. यावेळी रायडी यांनी आपण या विषयावर उद्या सकाळी ऑफिसमध्ये आल्यावर बोलू असे सांगितले. त्यावर त्या अज्ञात व्यक्ती म्हणाल्या आम्हाला वेळ द्या कामगारांच्या उदरनिर्वाह व रोजीरोटीचा प्रश्न आहे. दरम्यान रायडी यांनी संजय फाळके यांचेशी संपर्क साधण्यासाठी फोन काढला असता त्या व्यक्ती बंगल्यातुन निघून गेल्या.

दुसऱ्यादिवशी दि.१५ जानेवारी २०२३ रोजी रात्री ८ वाजून ५० मिनिटांनी रायडी यांचा मोबाईल क्र.८५००६९३९९० वर ७०६६५२४४५१ या मोबाईल नबरवरून धमकीचा फोन आला धमकी देताना समोरचा व्यक्ती हिंदी भाषेत म्हणाला हॅलो बाबू कल का क्या हो गया, कल बात किया था ओ कल क्या बात किया था,कल रात को तेरा बाप आया था ना कंपनी मे बात करने के लिए असे बोलून धमकावले रायडी यांनी कंपनीचे सिक्युरिटी गार्ड राहुल किसन साबळे यांना रायडी यांनी मला फोनवरून कुणी तरी शिव्या देऊन धमकी देत असल्याचे सांगितले या घटनेची खबर रायडी यांनी सातारारोड आउटपोस्टमध्ये दिल्यानंतर या घटनेची पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा म्हणून नोंद करत तपास सुरू केला आहे.

## गळफास घेऊन युवतीची आत्महत्या

**सातारा :** गळफास घेऊन युवतीने आत्महत्या केल्याची तक्रार सातारा शहर पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, दि. ९ फेब्रुवारी रोजी दीड वाजण्याच्या पूर्वी देगाव रस्ता, एमआयडीसी, सातारा येथील मुलींच्या गणेश वसतीगृह येथील टेरेस वरील पत्र्याच्या शेडमध्ये असलेल्या लोखंडी अँगलला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन साक्षी संतोष कुंभार मूळ रा. फलटण, ता. फलटण हिने आत्महत्या केल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. अधिक तपास महिला पोलीस नाईक अवघडे करीत आहेत.

# सरकार काय शेंगदाणे-फुटाणे खातयं का? पीक विम्यावरून अजित पवार संतापले

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून शिंदे-फडणवीस सरकारवर निशाणा साधला आहे. दरम्यान याचवेळी त्यांनी राज्यातील पीक विम्याच्या मुद्यावरून देखील सरकारवर खोचक शब्दात टीका केली आहे. 'पीकविमा न देणारं सरकार शेंगदाणे-फुटाणे खातयं का? असा टोला अजित पवार यांनी लगावला आहे. औरंगाबादच्या वैजापूर येथील शेतकरी मेळाव्यात बोलताना त्यांनी ही टीका केली आहे.



यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले की, शेतमालापेक्षा खताचे दर वाढल्याने काहीच परवडत नाही. मागे यांनीच सांगितले होते की, शेतकऱ्यांना जो काही खर्च येईल त्याच्या दीडपट त्यांच्या हातात देऊ. पण कुठे आहेत दीडपट भाव, आजही या सरकारच्या काळात तीन ते चार शेतकरी आत्महत्या करत आहे. त्यामुळे सरकार कमी पडत असून, याला जबाबदार कोण आहे. खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे मोठ्याप्रमाणावर नुकसान झाले, मात्र त्याचं पीकविमा अजूनही जमा झाला नाही. त्यामुळे हे सरकार काय करत आहे, फुटाणे खातयं का? शेंगदाणे खात आहे, असा खोचक टोला अजित पवार यांनी लगावला आहे.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, हे सरकार आलं आणि शेतमालाचे भाव पडले, त्यामुळे यांचा पायगुण बघा. सरकारमध्ये आल्यावर या लोकांनी सांगितले की, आम्ही दिवसा लाईट देऊ, पण कुठं दिवसा लाईट देत आहे. आणखी यांच्याकडून आहे ती लाईट तोडण्यात येत आहे. राज्यात रोज तीन-चार शेतकरी आत्महत्या करत असून, हे सरकारचा नाकर्तेपणा नाही का? याला जबाबदार कोण? असा सवाल देखील पवारांनी उपस्थित केला.

# मर्चंट नेव्हीमध्ये नोकरी लावतो म्हणून ५ लाखांचा गंडा

## ▪ धकटवाडी येथील पिता –पुत्रा वर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**वडूज : प्रतिनिधी**

मर्चंट नेव्हीत नोकरी लावण्याचे अमिष दाखवून रामदास खाशाबा जाधव व ओंकार रामदास जाधव (रा.धकटवाडी, ता.खटाव) येथील पिता पुत्रांनी आठ युवकांची ५ लाख १२ हजार रुपयांची फसवणूक केल्याची तक्रार रामचंद्र विष्णू देशमुख (रा. सिध्देश्वर कुरोली,ता.खटाव) यांनी वडूज पोलीस ठाण्यात दिली आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, रामचंद्र देशमुख यांची आणि रामदास खाशाबा जाधव यांची जून २०२१ मध्ये येथील स्टेट बँकेत एका कामानिमित्त ओळख होती. त्यावेळी त्यांचा मुलगा ओंकार जाधव हा मर्चंट नेव्हीमध्ये कामाला असून त्याची मोठ्या साहेबांशी ओळख आहे. तुमच्या मुलाचे काम करायचे आहे का? अशी विचारणा केली. त्यावेळी मुलगा अनिकेत देशमुख (वय २२) हा सद्या पुणे येथे खासगी कंपनीत काम करीत असून त्यालाही नोकरीची आवश्यकता असल्याचे सांगितले. जाधव याने आपल्या ओळखीचे सागर बाळासाहेब खाडे यांचेही मर्चंट नेव्हीत काम करण्यासाठी पैसे घेतले होते त्यामुळे माझा त्यांच्यावर विश्वास बसला. त्यावर अनिकेत याच्या शिक्षणाची कागदपत्रे ओंकार जाधव याच्या मोबाईल क्रमांकावर पाठविली असता तुमच्या मुलाचे काम होईल, त्यासाठी वरच्या साहेबांना मॅनेज करण्यासाठी अगोदर ५० हजार रूपये भरावे लागतील असे सांगितले. त्यानुसार आपण घरातील काही रक्कम व नातेवाईकांकडून काही रक्कमेची जुळवाजुळव करून ३५ हजार रूपये जमवून ते जाधव यांना दिले. त्यावेळी जाधव यांनी सदरची रक्कम घेऊन उर्वरीत १५ हजार रूपये पुढील आठवड्यात द्या असे सांगितले. त्यानंतर सप्टेंबर २०२१ मध्ये ओंकार जाधव याने तुमच्या मुलाचे काम झाले आहे. त्यासाठी तुम्ही पहिल्या रक्कमेतील उर्वरीत १५ हजार रूपये व जादा ५० हजार रूपये असे एकूण ६५ हजार रूपये आजच पाठविल्यास तुमची ऑर्डर निघेल असे सांगितले. त्यावर अनिकेत देशमुख याने ओंकार जाधव याच्या बँक खात्यावर ६५ हजार रूपये पाठविले. त्यानंतर पंधरा दिवसांनी ऑर्डर निघेल असे ओंकार जाधव याने सांगितले. संबंधित नोकरीची ऑर्डर पंधरा दिवसांनीही न निघाल्याने देशमुख यांनी ओंकार यास फोन केल्यानंतर सद्या कोवीड काळाचे निर्बंध असल्याने कामावरती हजर होता येणार नाही, मला वरून समजल्यावर बोलावून घेतो असे सांगितले. त्यानंतर ओंकार यास कामाबद्दल फोन करून विचारणा केली असता त्याच्याकडून टोलवाटोलवीची उत्तरे मिळू लागली तसेच फोन घेण्याचे टाळण्यात येऊ लागले. रामदास जाधव यांना धकटवाडी येथे भेटून नोकरीबाबत विचारले असता तुमचे काम झाले नाही तर पैसे परत देतो असे सांगून टाळण्यात आले. दरम्यानच्या काळात जाधव हे त्यांचे गाव सोडून कोडोली (सातारा) येथे कामानिमित्त वास्तव्यास होते. त्याठिकाणी त्यांना भेटण्यासाठी व पैसे मागण्यासाठी गेले असता त्याठिकाणी देशमुख याच्याकडून एकूण १ लाख रूपये तसेच अशोक निवृत्ती निंबाळकर (रा. सिध्देश्वर कुरोली) यांचेकडून १ लाख रूपये, सागर खाडे (रा. एनकूळ) यांच्याकडून ३५ हजार रूपये, समीर प्रकाश शिंदे (रा.वडूज) यांच्याकडून ६२ हजार ४०० रूपये, ऋषीकेश जाधव (रा.निसळबेंद,वडूज) यांच्याकडून ६३ हजार रूपये, प्रदिप भानुदास गुजर (रा. खातगुण) यांच्याकडून ४० हजार रूपये, वैभव बळवंत देवकर (रा. राणंद, ता.माण) यांच्याकडून २५ हजार रूपये घेतल्याचे देशमुख यांना समजले.

मर्चंट नेव्हीत नोकरीस लावतो म्हणून ओंकार जाधव व रामदास जाधव यांनी आपल्यासह एकूण आठ युवकांची ५ लाख १२ हजार रूपयांची फसवणूक केली असल्याची तक्रार रामचंद्र देशमुख यांनी वडूज पोलीस ठाण्यात केली. या तक्रारीवरून ओकार रामदास जाधव व रामचंद्र खाशाबा जाधव या पितापुत्रांच्या वर वडूज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधीक तपास पोलीस हवालदार शांतीलाल ओबांसे करीत आहेत.

# अश्विनी जगताप यांना एक लाखांच्या मताधिक्याने निवडून देण्याची जनभावना; बाळासाहेबांच्या शिवेसेनेचाही सिंहाचा वाटा असेल – खासदार श्रीरंग बारणे

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीतील महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचाराच्या नियोजनासाठी खासदार श्रीरंग बारणे यांच्या नेतृत्वाखाली बाळासाहेबांची शिवसेना पक्षाची शनिवारी थेरगावमध्ये बैठक झाली. त्यामध्ये खासदार बारणे यांनी अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा एक लाखांहून अधिक मताधिक्याने विजयी करण्याची जनभावना निर्माण झाल्याचे सांगितले. त्यांना मिळणाऱ्या मताधिक्यामध्ये बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचा सिंहाचा वाटा असावा यासाठी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी जोरदार प्रचार सुरू करावा, असे आवाहन त्यांनी केले.



चिंचवड पोटनिवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, बाळासाहेबांची शिवसेना, आरपीआय (आठवले गट), रासप, शिवसंग्राम संघटना, रयत क्रांती संघटना, प्रहार संघटना या महायुतीच्या उमेदवार अश्विनी लक्ष्मण जगताप यांच्या प्रचारासाठी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या नेतृत्वाखाली थेरगाव येथील दत्त मंदिरात शनिवारी बैठक झाली.

यावेळी बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, युवासेना प्रमुख विश्वजीत बारणे, शहरप्रमुख निलेश तरस, उपजिल्हाप्रमुख राजेश वाबळे, शहर संघटक हेमचंद्र जावळे, उपशहरप्रमुख रविंद्र ब्रह्मे, जिल्हा संघटिका शैला पाचपुते, उपजिल्हासंघटिका शारदा वाघमोडे, पिंपरी विधानसभा प्रमुख शैला निकम तसेच भाजपाचे चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख शंकर जगताप, शहर संघटन सरचिटणीस अमोल थोरात आदी उपस्थित होते.

खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, अश्विनी लक्ष्मण जगताप या महायुतीच्या उमेदवार आहेत. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड मतदारसंघात अनेक विकासकामे केली आहे. त्याच्या जोरावर अश्विनी लक्ष्मण जगताप यांचा पोटनिवडणुकीत विजय निश्चितपणे होणार आहे. मतदारसंघातील जनतेने त्यांना विजयी करून भरघोस मतांनी विधानसभेत पाठविण्याचा निर्धार पक्का केलेला आहे. त्यांना एक लाखांहून अधिक मताधिक्यांनी विजयी करण्याची जनभावनाच निर्माण झालेली आहे. या जनभावनेचा बाळासाहेबांच्या शिवसेनेने आदर करायला हवा. अश्विनी लक्ष्मण जगताप यांना मिळणाऱ्या मताधिक्यामध्ये बाळासाहेबांच्या शिवसेनेचा सिंहाचा वाटा राहावा यासाठी पक्षाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचा जोमाने प्रचार सुरू करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# सातारा शहरातील दहा जुगार अड्ड्यांवर छापे

## २९ हजार ५१३ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत; १८ जणांवर कारवाई

**सातारा : प्रतिनिधी**

पोलिसांनी सातारा शहर आणि परिसरातील १० जुगार अड्ड्यांवर छापे टाकून २९ हजार ५१३ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करीत १८ जणांवर कारवाई केली आहे.

याबाबत माहिती अशी, शहरातील मार्केट यार्डलगतच्या बोळात लक्ष्मण सिताराम पवार रा. नुने, ता. पाटण आणि गणेश चंद्रकांत ठोकळे रा. करंजे, सातारा हे जुगार घेताना आढळून आले. त्यांच्याकडून १०२५ रुपयांची रोख रक्कम व जुगाराचे साहित्य हस्तगत केले आहे. दुसऱ्या घटनेत मोळाचा ओढा चौक येथे फिरोज खुदबुद्दीन झारी रा. तामजाई नगर, सातारा आणि विकास तानाजी निकम रा. आंबेदरे, ता. सातारा यांच्याकडून जुगार प्रकरणी ८१० रुपये आणि जुगाराचे साहित्य जप्त केले.

तिसऱ्या घटनेत कोडोली, ता. सातारा येथील दशरथ जाधव यांच्या भांड्याच्या दुकानासमोर असलेल्या शेडमध्ये कारवाई करीत निकेतन किशोर पिसाळ रा. करंजे पेठ, सातारा आणि चंद्रकांत चोरगे रा. रविवार पेठ, सातारा यांच्याकडून जुगार प्रकरणी ४ हजार ९७५ रुपये. चौथ्या घटनेत मंडईचा राजा जुना मोटर स्टॅन्ड येथील शौचालयाच्या आडोशाला कारवाई करीत गुरुप्रसाद शेखर साठे रा. शुक्रवार पेठ, सातारा आणि सतीश रामेश्वर मते (रा. मोळाचा ओढा, सातारा) यांच्याकडून ५ हजार ५२२ रुपये. पाचव्या घटनेत पोवई नाका ते पारंगे चौक कडे जाणाऱ्या रस्त्यावरील गणपती मंदिराच्या पाठीमागे असणाऱ्या पत्र्याच्या शेडच्या आडोशाला सुमित परशुराम बनसोडे रा. म्हसवे, ता. सातारा हा जुगार घेताना आढळून आला. त्याच्याकडून ९४५ रुपये आणि जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे. सहाव्या घटनेत अजंठा चौक प्रीती हॉटेलच्या पाठीमागे टपरीच्या आडोशास जुगार प्रकरणी कारवाई करीत कुमार गुंडीबा गायकवाड रा. विक्रांत नगर, सातारा आणि चंद्रकांत रमेश चोरगे रा. रविवार पेठ, सातारा यांच्याकडून ११७५ रुपये. सातव्या घटनेत सेवन स्टार इमारत सातारा येथील एम.एच. ११ चायनीज रेस्टोच्या आडोशाला जुगार प्रकरणी कारवाई करीत दशरथ सखाराम फरांदे रा. गडकर आळी, सातारा आणि गणेश चंद्रकांत ढोकळे रा. करंजे, सातारा यांच्याकडून १५५२ रुपये. आठव्या घटनेत विराज बेकरी कोडोली येथील पान टपरीच्या आडोशाला शुभम सत्यवान कांबळे रा. खेड, तालुका सातारा याच्याकडून २१९० रुपये. नवव्या घटनेत जुना मोटर स्टॅन्ड येथे जुगार प्रकरणी कारवाई करीत तौसीफ उर्फ बबलू सलीम सय्यद रा. गुरुवार पेठ, सातारा, संदीप सर्जेराव शिंदे आणि समीर कच्छी रा. सातारा यांच्याकडून ८८०४ रुपये. दहाव्या घटनेत शिवराज पंपाच्या समोर आडोशाला जुगार प्रकरणी कारवाई करीत संतोष सुरेश मेटकरी, रा. विलासपूर, ता. सातारा याच्याकडून २४१५ रुपये आणि जुगाराचे साहित्य हस्तगत करण्यात आले आहे.

# एचआयव्ही बाधित मुलांचे संगोपन करणाऱ्या रवी बापटले यांच्यावर गुन्हा दाखल

**औसा : प्रतिनिधी**

लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यामधील हासेगाव येथील एड्सग्रस्त मुलाचे संगोपन करणाऱ्या प्रकल्प 'सेवालया'चे प्रमुख रवी बापटले यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. २१ महिन्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने बापटले यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. रवी बापटले यांनी सेवालया शेजारी असलेल्या भीमाशंकर बावगे यांची शेती ताब्यात घेण्यासाठी दबाव निर्माण केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. अनेकदा सेवालयातील मुलांना हल्ला करण्यासाठी पाठवत असत असादेखील त्यांच्यावर आरोप झाला. रवी बापटले आणि अन्य आठ साथीदारांनी मे २०२१ मध्ये जीवघेणा हल्ला केला होता. यात कत्ती आणि अन्य प्राणघातक शस्त्रांचा वापर केला होता, अशी तक्रार भीमाशंकर बावगे यांनी पोलिसात दिली होती.

# गुजरातच्या कच्छमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के; रिश्टल स्केलवर ३.७ तीव्रतेची नोंद

**सूरत : वृत्तसंस्था**

गुजरातच्या सूरतनंतर आता कच्छमध्येही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. रिश्टर स्केलवर ३.७ एवढ्या तीव्रतेची नोंद करण्यात आली आहे. या भूकंपाचा केंद्रबिंदू कच्छपासून २५ किलोमीटरवर आहे. याआधी शुक्रवारी रात्री सूरतमध्येही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते. त्याची तीव्रता ३.८ एवढी होती.

भूकंप विज्ञान संशोधन संस्थेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, या भूकंपाची तीव्रता ३.८ एवढी नोंदवण्यात आली आहे. याचा केंद्र जमीनीखाली ५.२ किलोमीटरवर होता. तर याचा केंद्रबिंदू अरबी समुद्रात होता. या भूकंपामुळे जिवीत किंवा वित्तहानीचे वृत्त नाही. मात्र, सूरतनंतर कच्छमध्येही भूकंपाचे धक्के जाणवल्याने जनतेमध्ये घबराट पसरली आहे.

गुजरात हे भूकंपप्रवण भागात मोडते. या राज्यात भूकंपाचे सर्वाधिक धोका आहे. याआधी १८१९, १८४५, १८४७, १८४८, १८६४, १९०३, १९३८, १९५६ आणि २००१ मध्ये गुजरातला भूंकपाचे मोठे धक्के बसले आहेत. २००१ मध्ये कच्छमध्ये आलेला भूकंप गेल्या दोन दशकातील देशातील तिसरा सर्वात जास्त तीव्रतेचा भूकंप होता. त्यात १३,८०० जणांचा मृत्यू झाला होता. तर १.६७ लाख जण जखमी झाले होते.

# कोरेगावचा विकास आराखडा रद्द करण्यासाठी एक दिवसाचे उपोषण

## संभाजी ब्रिगेड, मनसेचा पाठिंबा




**कोरेगाव : प्रतिनिधी**

शासनाने जाहीर केलेल्या प्रारूप विकास आराखड्याचा विरोध आणी निषेध करण्यासाठी कोरेगाव बचाव संघर्ष समितीच्या वतीने तहसील कार्यालयासमोर एक दिवसाचे लक्षणिक उपोषण करण्यात आले. या उपोषणाला संभाजी ब्रिगेड आणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठीबा दिला.

शासनाच्या नगर रचना विभागाने कोरेगाव शहरासाठी तयार केलेल्या प्रारूप विकास आराखडा विरोधात बाधित शेतकऱ्यांनी आणोदलांनचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार कोरेगाव बचाव संघर्ष समितीने सोमवारी जुना मोटार स्टॅण्ड परिसरात रास्तरोको आंदोलन केले हते. त्यानंतर शुक्रवारी तहसील कार्यालया समोर एक दिवसाचे लक्षणिक उपोषण केले. उपोषणावेळी विकास आराखडा शेतकऱ्यावर अन्याय करणारा आहे. त्यांना भूमिहीन करणारा आहे, त्यामुळे तो रद्द करावा. शेतकऱ्यांनी यापूर्वी रेल्वे, पुनर्वसन , विविध शासकीय कार्यालय, म्यॅफको, कॉलेज साठी जागा दिल्या आहेत. आता नव्याने केलेल्या आराखड्यात एका एका शेतकऱ्याची सात सात एकर जमिनी जात आहेत. शेतीवर गरीब शेतकऱ्याचे कुटुंब जगत आहे. ती जमीन गेली तर तो भूमिहीन होईल . त्याचे कुटुंब निराधार होईल. लोकांना जगणे मुशकील होईल. शासनाने या गोष्टीचा गांभीर्यांने विचार करावा आणी आराखडा रद्द करावा, अशी मागणी शेतकरी वसंत बर्गे, अशोक बर्गे, आरिफ शेख, विवेक चव्हाण, प्रभाकर बर्गे, श्रीकांत जाधव, सोमनाथ बर्गे, कल्याण बर्गे, अभिजीत बर्गे यांनी आपल्या भाषणात केली.

सकाळी दहा वाजता सुरु झालेल्या उपोषणाला माजी सभपती संजय झवर, माजी उपसभापति किशोर बाचल यांनी भेट दिली.

उपोषणास प्रतिभा बर्गे, मनोहर बर्गे, दिनेश बर्गे, संजय पिसाळ, हेमंत बर्गे, हणमंत पवार, अमरसिहं बर्गे, प्रशांत बर्गे, प्रीतम बर्गे, अशोक महाडिक, विजयकुमार बर्गे, सागर बर्गे, अक्षय बर्गे, डॉ. गणेश् होळ, प्रशांत गायकवाड, मनोज येवले, किशोर बर्गे, प्रताप बर्गे, सचिन बर्गे, ॲड पांडुरंग भोसले, अभिजित बर्गे, जयप्रकाश दायमा, हणमंत बर्गे यांच्या सह बाधित शेतकरी उपस्थित होते.

# 'शिवरत्न पॅटर्न'च्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांना जिंकण्याची सवय लावली - शीतलदेवी मोहिते-पाटील

## ▪ शिवरत्न पॅटर्नच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या करिअरला दिशा देण्याचे काम

**अकलूज : प्रतिनिधी**

दहावी आणि बारावीच्या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा या निर्णायक वळणावर करिअरच्या दृष्टीने योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे यासाठी शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष धैर्यशिल मोहिते-पाटील व अध्यक्ष शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या सूचनेनुसार शिवरत्न पॅटर्नच्या वतीने दहावी व बारावी नंतर करीअरच्या संधी या विषयावर विद्यार्थी व पालक यांचेसाठी शिक्षणतज्ञ सारिका मोहन पाटील यांचे वैद्यकीय व अभियांत्रिकी प्रवेश परीक्षा या विषयावर मार्गदर्शन सेमिनार व शिवरत्न टॅलेंट सर्च परीक्षा २०२२ बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते.

Neet/JEE/MHCET परीक्षांना सामोरे जाताना येणाऱ्या अडचणींबाबत सखोल मार्गदर्शन. दहावी व बारावी नंतर कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा? कोणतं करिअर निवडायचं? असे प्रश्न प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या मनात असतो. तुमच्याकडे असलेल्या क्षमता, मिळणारे ज्ञान, या क्षेत्रातील आव्हानं तसचं तुमच्या अभ्यासाचा उपयोग हे पाहून करिअर निवडावे. त्यासाठी शिक्षणतज्ज्ञ सारिका पाटील यांचे मार्गदर्शनाची लाभले.



शिवरत्न पॅटर्नच्या वतीने इ.१० वी मधील विद्यार्थ्यांसाठी शिवरत्न टॅलेंट सर्च परीक्षा' आयोजित करण्यात आली होती. या वेळेस परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

- **चि.शिवराज सुरवसे, पुरंदावडे– प्रथम क्रमांक**
- **चि.हर्ष गांधी,अकलूज – द्वितीय क्रमांक**
- **चि.अदर्श घाळे, नातेपुते – तृतीय क्रमांक**
- **कु.साक्षी गोरे ,नातेपुते, –तृतीय क्रमांक**
- **कु.प्राची रणनवरे , फळवणी – उत्तेजनार्थ**
- **चि.राज फडे, अकलूज– उत्तेजनार्थ**
- **कु.श्रुती नरवणे, संग्रामनगर – उत्तेजनार्थ**
- **कु.सृष्टी भोसले ,फळवणी– उत्तेजनार्थ**
- **कु.अनुष्का केदारी – सवतगव्हाण – उत्तेजनार्थ**
- **चि.आर्यन मगर ,यशवंतनगर – विशेष प्राविण्य**
- **चि.साहील देवडे, अकलूज – विशेष प्राविण्य**

सदर कार्यक्रमासाठी शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष शितलदेवी मोहिते पाटील, सचिव धर्मराज दगडे, संचालक डॉक्टर विश्वनाथ आवड ,श्रीकांत राऊत, दत्तात्रय लिके,प्रशांत जगताप,अनिल जाधव ,तानाजी काशिद,नितीन बनकर प्राचार्य अरविंद कुंभार,उपप्राचार्य डॉ.महेश ढेंबरे, अश्फ शेख व समन्वयक राजकिरण माने व इतर मान्यवर उपस्थित होते.

या परीक्षेत प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यास १०,०००/- रुपये, द्वितीय क्रमांकास ७०००/- रुपये, तृतीय क्रमांकास ५०००/- रुपये तर उत्तेजनार्थ पाच विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०००/- रुपये व प्रमाणपत्र तसेच सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक रोहित देशमुख यांनी केले तर प्रस्तावना समन्वयक राजकिरण माने देशमुख यांनी केले.

# विलासपूर आणि परिसरातील तब्बल १४ विकास कामांसाठी साडेचार कोटींचा निधी मंजूर

## खासदार उदयनराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे यश



**सातारा : प्रतिनिधी**

सातारा शहराच्या दक्षिणेकडे विलासपूर आणि लगतच्या परिसरातील सुचवलेली साडेचार कोटींची कामे मंजूर करण्यात आली असून नुकतीच मंत्रालयातून या कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कामांना वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजुरी दिली असून खासदार उदयनराजे भोसले यांच्या पाठपुराव्यामुळे ही कामे मंजूर झाल्याचे युवाशक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष संग्राम बर्गे यांनी सांगितले.

या कामांमध्ये विलासपूर येथील फॉरेस्ट कॉलनी गणेश नगरलगत ओढ्याला वॉकिंग ट्रॅक आणि ड्रेनेज सिस्टीम करणे एक कोटी ३५ लाख, गोळीबार मैदानातील साई कॉलनी ते पालवी चौक दोन्ही बाजूंनी सिस्टीम रस्ता करणे एक कोटी दहा लाख, काळंबीचा ओढा येथे साकव पूल बांधणे ३० लाख, साई कॉलनी येथील ओपन स्पेसमध्ये वॉकिंग ट्रॅक ओपन जिम ३० लाख, सुतार कॉलनी येथील मोकळ्या जागेत सभा मंडप बांधणे ३० लाख, नंदादीप गृहनिर्माण संस्थेमध्ये अंतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे १० लाख, अवि कॉलनी येथील १०० मीटर रस्ता खडीकरण आणि डांबरीकरण करणे १० लाख, बापूजी साळुंखे नगर व शिवशक्ती नगर येथे डांबरीकरण १० लाख, गणेश नगर ते गणेश नगर फॉरेस्ट कॉलनी यांना जोडणारा रस्ता डांबरीकरण खडीकरण करणे १० लाख, कारंजकरनगर येथे रस्ता डांबरीकरण करणे १० लाख, विनायक हाऊसिंग सोसायटी येथील रस्ते खडीकरण व डांबरीकरण १५ लाख, सहजीवन सोसायटी येथील मोकळ्या जागेत बाग बगीचा विकसित करणे ३० लाख, राधिका नगर येथे बंदिस्त कटर बांधकाम १० लाख, पायरी पार्क गोळीबार मैदान येथील ओपन स्पेस विकसित करणे २० लाख अशा १४ कामांना एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

या संदर्भातील प्रस्ताव संग्राम बर्गे यांनी खासदार उदयनराजे भोसले यांच्यामार्फत नगर विकास विभागाकडे सादर केला होता उदयनराजे यांनी या १४ कामांविषयी सातत्याने पाठपुरावा करून विलासपूर आणि लगतच्या परिसरातील नागरिकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे या कामाच्या निविदा लवकरच काढल्या जाणार असून प्रत्यक्ष कामांना सुरुवात केली जाणार असल्याची माहिती युवाशक्ती फाउंडेशनचे अध्यक्ष संग्राम बर्गे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

## विनापरवाना बैलगाडी शर्यतीचे आयोजन केल्याप्रकरणी आयोजकांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

विनापरवाना बैलगाडी शर्यतीचे आयोजन केल्याप्रकरणी आयोजकांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, बोरखळ, ता. सातारा येथे दिनांक ९ फेब्रुवारी रोजी कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता, बेकायदेशीररित्या बैल गाड्या शर्यतीचे आयोजन केल्याप्रकरणी तसेच प्राण्यांना क्रूरपणे मारहाण केल्याप्रकरणी मोन्या पाटील, ऋषिकेश नलवडे, रोहन पाटील व अन्य आयोजकांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक दळवी करीत आहेत.

# शिवशाही बसमध्ये आढळला मृतदेह...

**कराड : प्रतिनिधी**

कराड येथील बसस्थानकात शिवशाही बसमध्ये एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला आहे. त्यामुळे बसस्थानक परिसरात तसेच प्रवाशांच्यात खळबळ उडाली. घटनास्थळी कराड शहर पोलिसांनी तात्काळ धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करीत आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कराड बसस्थानकात गेल्या १५ दिवसापासून एकाच जागेवर उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. या व्यक्तीचे वय अंदाजे ४५ ते ५० असावे. मृतदेह शवविच्छेदनासाठी रात्री उशिरा स्व. वेणूताई चव्हाण उपजिल्हा रूग्णालयात पाठविण्यात आला.

कराड बसस्थानक परिसरात आढळून आलेल्या मृतदेहाबाबत घातपात झाला नसल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तविला आहे. कदाचित गारठ्यामुळे मृत्यू झाल्याचा पोलिसांचा संशय आहे. तरीही शवविच्छेदन आवाहल आल्यानंतर अधिक माहिती समोर येईल असे पोलिसांनी सांगितले आहे.

# मारहाण करून जबरी चोरी केल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

**सातारा : प्रतिनिधी**

मारहाण करून जबरी चोरी केल्याप्रकरणी चौघांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, ऑर्केस्ट्राच्या कार्यक्रमाच्या वेळी हाकलून दिल्याचा राग मनात धरून दि. ९ फेब्रुवारी रोजी पावणे चार वाजण्याच्या सुमारास लिंब फाटा ता. सातारा येथील रस्त्यावर सचिन सदाशिव चोरट रा. कोढवली, लिंब, ता. सातारा यांना मारहाण करीत जबरी चोरी केल्याप्रकरणी शुभम नवनाथ बरकडे, गोरख चंद्रकांत बरकडे दोघे रा. लिंब, ता. सातारा, अभय राजे रा. कोंढवली लिंब, सातारा आणि अब्दुल सिद्धीगी रा. लिंब फाटा सातारा यांच्यावर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

अधिक तपास सहाय्यक फौजदार बागवान करीत आहेत.

सातारा जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या समस्येबाबत

# जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

**सातारा : प्रतिनिधी**

साखर कारखान्यात येणारे ऊसतोड कामगार ज्या ठिकाणी वास्तव्याला आहेत व जे सतत मागील तीन वर्ष ऊसतोड म्हणून काम करीत असतील त्यांना ग्रामसेवकांनी संबंधित गावातील, वस्त्यांमधील, तांड्यामधील, पाड्यांमधील व इतर यांना ओळखपत्र देण्यात यावीत अशा सूचना जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांनी दिल्या.

बैठकीमध्ये साखर कारखान्यात येणारे ऊसतोड कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा यासाठी ऊसतोड कामगारांची नोंदणी करुन त्यांना ऊसतोड कामगार असल्याचे ओळखपत्र देण्यात यावे. तसेच स्थानिक पातळीवर काही समस्या उद्धवल्यास त्याचे तातडीने निराकरण करण्यात यावे अशा सूचनाही श्री. जयवंशी यांनी दिल्या.

बैठकीला सहायक आयुक्त समाज कल्याण नितीन उबाळे, जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांचे व्यवस्थापकीय संचालक, प्रतिनिधी उपस्थित होते.

# सर्वसामान्य लोकांची कामे लवकर होण्यासाठी 'शासन आपल्या दारी' उपक्रमांचे आयोजन - पालकमंत्री शंभूराज देसाई



सातारा, दि. १० -लोकांच्या कामासाठी सरकार काम करत आहे. सातबारा, रेशन कार्ड यासह इतर दाखले लोकांना मिळणे सोपे व्हावे यासाठी शासन आपल्या दारी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केले. खंडाळा तालुक्यातील विंग येथे आयोजित महाराजस्व अभियानांतर्गत शासन आपल्यादारी या शिबिरास पालकमंत्री श्री. देसाई यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी खंडाळा तहसीलदार दशरथ काळे, विंगचे सरपंच पुनम तळेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व ग्रामस्थ मोठ्यासंख्येने उपस्थित होते. सर्व सामान्य लोकांना जागेवर न्याय मिळाला पाहिजे असे सांगून पालकमंत्री श्री. देसाई म्हणाले, सर्व सामान्य माणसाला त्याच्या नियमित असणाऱ्या कामासाठी हेलपाटे घालायला लागू नयेत अशा पद्धतीचे काम आपल्याला करायचे आहे. सामान्य माणसाच्या दरात शासन गेलं पाहिजे. शासन हे सर्व सामान्य जनतेसाठी आहे. अशा प्रकारचे लोकाभिमूख काम जिल्ह्यात निश्चितच केले जाईल. सर्व सामान्य जनतेसाठी राबवण्यात येणारे असे उपक्रम प्राधान्याने राबवण्यात यावेत, यासाठी अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील. या शिबिराच्या माध्यमातून नक्कीच जनतेचे प्रश्न सोडवले जातील, असे पालकमंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.

महाराजस्व अभियानांतर्गत राबवण्यात येत असलेल्या शासन आपल्या दरी या शिबिराचे खंडाळा तालुक्यातील विंग येथे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात शासनाच्या महसूल, आरोग्य, शिक्षण, ग्रामपंचायत, पाणी पुरवठा, भूमिअभिलेख या सह दैनंदिन व्यवहारामध्ये सबंध येणाऱ्या व तालुकास्तरावरील मिळणाऱ्या दाखल्यांविषयीचे लोकांचे कामकाज करण्यात आले.

## सातारा जिल्हा परिषदेच्या वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे ढोल-ताशांच्या गजरात शानदार उद्घाटन

# क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कलागुणांना वाव - सीईओ ज्ञानेश्वर खिलारी

**सातारा : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदे अंतर्गत तब्बल १० वर्षांनंतर वार्षिक क्रीडा व व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धेत व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊन ताण-तणाव विसरुन अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आनंद घ्यावा व आपल्या कला गुणांना वाव द्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर खिलारी यांनी केले.

येथील पोलीस कवायत मैदानावर जिल्हा परिषदेच्या वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे १० ते १२ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन विविध सांस्कृतिक कार्यक्रम व गझी नृत्य व लेझीम ढोल-ताशांच्या गजरात मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खिलारी यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) अर्चना वाघमळे यांच्यासह जिल्हा परिषदेतील विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्साह पाहून आनंद होत असल्याचे सांगून मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. खिलारी म्हणाले, प्रत्येक पंचायत समितींचे संघ या क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात सहभागी झाले आहेत. या स्पर्धेमुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कला गुणांना वाव मिळणार आहे. खेळाडूंनी खिलाडीवृत्तीने सर्व नियम पाळून खेळाचे प्रदर्शन करावे. प्रत्येक वर्षी वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात येईल. या पुढील काळातही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सातारा जिल्हा परिषदेचा आणखीन नावलौकीक कसा वाढेल यासाठी प्रयत्न करावा, असे आवाहनही श्री. खिलारी यांनी यावेळी केले.

**क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून सांस्कृतिक व विविध योजनांचा जागर**

जिल्हा परिषद अंतर्गत वार्षिक क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे १० ते १२ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी मिशन धाराऊ, मिशन जिजाऊ यासह जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा जागर व ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा असणारा सातारा जिल्हा या विषयी चित्ररथ तयार केले होते. हे चित्ररथ आणि सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थितांचे आकर्षण ठरले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज पुतळा पोवई नाका येथून आलेल्या क्रीडा ज्योतीचे ढोलताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यानंतर सर्व खेळाडूंनी उत्कृष्ट संचलन करून मान्यवरांना मानवंदना दिली. यानंतर उपस्थितांना श्री. खिलारी यांनी क्रीडा शपथ दिली.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा.लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११/२ आणि १/१३, वारजे पुणे-४११ ०५८ येथे मुद्रित करून अर्थभवन, पोवई नाका, सातारा येथून प्रकाशित केले. या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद सातारा न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. सीईओ आणि मॅनेजिंग एडिटर राजेश वरळेकर. RNI Regd No. : MAHMAR/17902/1999

# मेढ्यातील खुनाची केवळ बारा तासांच्या आत उकल

## दोघे संशयित जेरबंद; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सातारा : प्रतिनिधी**

मेढा, ता. जावली येथे पहाटेच्या सुमारास झालेल्या खुनाची उकल स्थानिक गुन्हे शाखेने केवळ बारा तासात केली आहे. याप्रकरणी दोघा जणांना जेरबंद करण्यात त्यांना यश आले आहे. अक्षय सोमनाथ साखरे वय २२, रा. गांधीनगर, मेढा आणि परमेश्वर गणपत पवार वय २६, रा. आंबेडकर नगर, मेढा अशी ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी दिनांक १० फेब्रुवारी रोजी पहाटे च्या सुमारास मेढा तालुका जावली गावच्या हद्दीत राम बाबू पवार वय ३६, रा. गांधीनगर, मेढा, ता. जावली यांचा कोणीतरी अज्ञातांनी डोक्यात सिमेंटच्या ओबडधोबड दगडाने आणि लाकडी फळीने मारहाण करून खून केला असल्याची फिर्याद मेढा पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आली होती.



या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांनी वाई च्या उपविभागीय पोलीस अधिकारी शितल जानवे खराडे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर, मेढा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर यांना तात्काळ घटनास्थळी जाऊन गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे हे पोलीस अधिकारी तात्काळ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळावर आल्यानंतर या अधिकाऱ्यांसह संतोष पवार, रवींद्र भोरे, पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील, विश्वास शिंगाडे यांनी घटनास्थळाजवळील व आजूबाजूच्या परिसरातील लोकांकडे विचारपूस केली. तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ची पाहणी केली असता फुटेज मध्ये गुन्हा घडला त्यावेळी पिवळ्या व काळ्या रंगाचे जर्किन घातलेले दोन संशयित आढळून आले. यानंतर पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, संतोष पवार, रविंद्र भोरे, पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील, विश्वास शिंगाडे यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र तपास पथके तयार करून त्यांना फुटेज मधील संशयितांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेण्याच्या सूचना दिल्या.

फुटेज मधील संशयतांचा तपास पथके शोध घेत असताना पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे यांच्या तपास पथकास हे संशयित मेढा शहरात सापडले त्यांना ताब्यात घेण्यात आले त्यानंतर त्यांच्याकडे संबंधित गुन्ह्याच्या अनुषंगाने विचारपूस केले असता त्यांनी मृत रामबाबू पवार हा एकाच्या वडिलांना जुन्या भांडणाच्या कारणावरून त्रास देत असल्याने त्याच्या डोक्यात दगड घालून खून केला असल्याचे सांगितले अशा रीतीने गंभीर खुनाचा गुन्हा केवळ बारा तासांच्या आत उघडकीस आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक समीर शेख, अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर, वाईच्या उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती शितल जानवे खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष तासगावकर, संतोष पवार, रविंद्र भोरे, पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील, विश्वास शिंगाडे, पोलीस अंमलदार उत्तम दबडे, तानाजी माने, सुधीर बनकर, संतोष पवार, संतोष सपकाळ, संजय शिर्के, विजय कांबळे, साबीर मुल्ला, मंगेश महाडिक, मुनीर मुल्ला, मोहन पवार, प्रवीण कांबळे, अजित करणे, गणेश कापरे, विशाल पवार, मोहसीन मोमीन, वैभव सावंत, सचिन ससाणे, शिवाजी गुरव, पंकज बेसके, सायबर विभागाचे अजय जाधव, अमित झेंडे, यशोमती काकडे, यशवंत घाडगे, निखिल घाडगे यांनी केली आहे. कारवाईत सहभागी झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक समीर शेख आणि अपर पोलीस अधीक्षक बापू बांगर यांनी अभिनंदन केले आहे.

# पत्रकार वारिशे अपघात प्रकरणाचा जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने निषेध

## या प्रकरणातील मास्टरमाइंड शोधण्याची केली मागणी




**सातारा : प्रतिनिधी**

राजापूर येथील 'महानगर टाईम'चे पत्रकार शशिकांत वारिशे यांचा गोदवली येथे दुचाकीला अपघात होऊन दुर्दैवी मृत्यू झाला. हा प्रकार अपघात नसून घातपात असल्याचा संशय व्यक्त करून सातारा जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर या प्रकरणाचा निषेध करण्यात आला.

सातारा जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष हरीश पाटणे सातारा शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांनी हे आंदोलन केले यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी जीवन गलांडे यांना निवेदन सादर करण्यात आले.

या पत्रकात नमूद आहे की, शशिकांत वारीशे यांचा हा अपघात नसून घातपातच आहे. गोदवली येथे वारीशे आपल्या दुचाकीने जात असताना भरधाव वेगाने आलेल्या थार गाडीने त्यांना धडक दिली. या भीषण अपघातात वारीसे यांचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. शशिकांत वारीशे यांनी ज्यांच्या विरोधात बातमी प्रसिद्ध केली ते कारचालक पंढरीनाथ आंबेरकर होते. हा अपघात योगायोग नसून कट रचून केलेला खूनच आहे. या घटनेचा सातारा जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने निश्चित निषेध करण्यात येत आहे. राज्यात गेल्या आठ दिवसात पत्रकारांचा आवाज बंद करण्याच्या किमान आठ घटना घडल्या आहेत. हत्या झालेले पत्रकार शशिकांत वारिश यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि राज्यात पत्रकारांना मुक्तपणे काम करता यावे, अशी मागणी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

# बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या महिला आघाडीच्या वतीने विविध कार्यक्रम



**वडूज : प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या जिल्हा महिला आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष शारदाताई जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपजिल्हा संघटिका संगीता पवार यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त महिला आघाडीच्या पाच नूतन शाखांचं उद्घाटन करण्यात आले. वडूज येथील ग्रामीण रुग्णालयात आरोग्य शिबिर , रक्तदान शिबिर व फळे वाटप कार्यक्रम राबविण्यात आले. या कार्यक्रमात डॉ.बी जे काटकर,डॉ. माने डॉ. कुलकर्णी, डॉ.भादुले यांची मुख्य उपस्थितीमध्ये वाढदिवसाचा केक कापण्यात आला.

कार्यक्रमास रितिका घोणे, लक्ष्मी अरबणे, रेखा महापुरे, राणी लोहार, दिपाली शिंदे, उज्ज्वला शिंदे, शितल लोहार रसिका राऊत, जयश्री सस्ते, शोभा कोळेकर, रूपाली काळे, रेखा लोहार, बेबीताई हिरवे, कांचन देशमुख ,सोनाली कुदळे ,रंजना गायकवाड,सरपंच राज्यश्री माळवे, विजय जाधव, संजना लोहार, विमल यादव, कुसुम दुबळे आदींची उपस्थिती होती.

# रमाताईंचा आदर्श महिलांना प्रेरणादायी- शोभाताई बनसोडे

**म्हसवड : प्रतिनिधी**

काळ्या मन्याची पोत ही सर्वसाधारण महिलांचा मौल्यवान दागीना असतो, मात्र आपले पती हाच खरा सर्वश्रेष्ठ दागीना आहे असे मानुन जी मायमाऊली घटनाकार बाबासाहेब आंबेडकरांच्या पाठीशी सावलीप्रमाणे उभी राहिली त्यांच्या त्यागातुनच बाबासाहेबांची शक्ती साऱ्या जगाला समजली ती माय माऊली म्हणजेच रमाताई आहे. या आदर्श व कणखर माऊलीचा आदर्श घेवुन महिलांनी आपली आयुष्याची वाटचाल करावी रमाताईंचा आदर्श महिलांना नवी प्रेरणा देईल असे मत सातारा येथील केंद्रीय शिक्षिका शोभाताई बनसोडे यांनी व्यक्त केले.

म्हसवड येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन या ठिकाणी माता रमाई यांची १२५ वी जयंती साजरी करण्यात आली यानिमीत्त आयोजीत कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणुन बोलत होत्या. यावेळी माण तालुका भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष सिध्दार्थ बनसोडे, सचिव श्रीमंत भोसले, बाळासाहेब सरतापे गुरुजी, कुमार सरतापे बाळासाहेब सरतापे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना शोभाताई बनसोडे म्हणाल्या की रमाई यांनी आईवडीलाच्या निधनानंतर थोरली बहिण या नात्याने आपल्या बहिणीला व भावाचे संगोपन केले त्यामुळे त्यांना आपले शिक्षण घेता आले नाही. मात्र बाल वयात कष्ट आणि विवाहानंतर हि कष्ट त्याग मुर्ती रमाई यांचे वाटेला आले त्या माऊलीने समाजासाठी आपली चार मुलांचा मृत्यू विसरून पती बाबासाहेब यांना परदेशात शिकताना पैशाची मदत व्हावी यासाठी शेन गोळा करून त्या शेनाच्या गोवऱ्या थापून त्या विकुण जमलेले थोडे घर खर्चासाठी व बाकीचे सर्व पैसे बाबासाहेब यांना परदेशी शिक्षणासाठी पाठवत होती. स्वत:च्या दु:खा पेक्षा समाज्याच्या दु:ख जाणनारी रमामाऊली सार्या जगाची माऊली



झाली पती ऐवढे परदेशी शिकलेले पण माझ्या माऊलीला साधी चांगली साडी मिळाली नाही चार ठिकाणी हाताने शिवलेली साडी गळ्यात तुटक डोर्ल अशी साधी राहणीमान असलेली रमाताईची ओळख होती.

यावेळी म्हसवड येथील १८ युवकांनी पाली भाषेत झालेल्या परिक्षेमध्ये सातारा जिल्ह्यात क्रमांक मिळवून विशेष यश मिळाल्याबद्दल त्यांचा व नुतन पदाधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.

दरम्यान, बौद्ध धम्माचा पाया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पालि भाषेला अनन्यसाधारण महत्त्व असुन सर्व कार्याचा विधी हा पाली भाषेतुन केला जातो त्यामुळे सर्व धर्मियांना या भाषेचे ज्ञान व्हावे यासाठी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने घेण्यात आलेल्या पालि भाषेच्या स्पर्धेत म्हसवड येथील १८ शालेय युवक, युवतीनी सहभाग घेतला होता त्या सर्वानी सातारा जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला त्याबद्दल त्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला त्यामध्ये आदर्श सरतापे, सम्राट सरतापे,अंकुश फुटाणकर,सुजय सरतापे, आचल सावंत, अथर्व सरतापे, निशांत कांबळे, संस्कृती सरतापे, श्रेया सरतापे, सोनाक्षी सरतापे, सलोनी सरतापे, अनघा सरतापे अस्मिता सरतापे, नम्रता कांबळे, सिध्दी सरतापे, पृथ्वी सरतापे आदी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता तर बाळासाहेब सरतापे गुरुजी यांनी व पिंटू बनसोडे यांनीही या स्पर्धेत यश मिळवल्या बदल त्याचा सत्कार करण्यात आला.

यावेळी नंदकुमार शिंदे, सिध्दार्थ बनसोडे श्रीमंत भोसले यांनी मार्गदर्शन केले.

तत्पूर्वी प्रथम सकाळी माता रमाई यांच्या १२५ व्या जयंती निमित्त शहरातून रॅली काढण्यात येवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे महिलांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तथागत गौतम बुद्ध, माता रमाई यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी समाधान बनसोडे, श्रेया बनसोडे यश धाईंजे या बालकांनी भाषणे झाली.

यावेळी परेश व्होरा, सचिन लोखंडे, अंगुली बनसोडे, एल. के. सरतापे, अरुण सरतापे शिवदास सरतापे, आकाश सरतापे, योगेश सरतापे, बंडू सरतापे, दशरथ झोडगे, मंगल सरतापे, अनिता सरतापे, साधना सरतापे रेखा सरतापे, स्वाती जोडगे पुजा बनसोडे आदीजण उपस्थित होते.

# कोरेगावतील आरोग्यवर्धिनी केंद्र लवकर सुरू करा; नगरसेविका स्नेहल आवटे यांची मागणी

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव येथील लक्ष्मीनगर येथे 'आयुष्यमान भारत' या केंद्र शासनाच्या योजनेतून पूर्ण झालेल्या नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र त्वरित सुरू करा, अशी मागणी कोरेगाव नगर पंचायतिच्या प्रभाग क्र.१ च्या नगरसेविका स्नेहल आवटे व नागरिकांनी कोरेगाव तालुका आरोग्य अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली 0आहे. हे निवेदन कोरेगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी क्रांती बोराटे यांनी स्वीकारले.



**नगरसेविका स्नेहल आवटे यांनी गटविकास अधिकारी क्रांती बोराटे यांच्याकडे निवेदन सुपूर्द केले. त्यावेळी उपस्थित विजय घोरपडे, सोमनाथ शिंदे आदी मान्यवर.**

दिलेल्या निवेदनात स्नेहल अर्जुन आवटे व नागरिकानी म्हटले आहे, आम्ही सर्व नागरिक विनंती करतो की, लक्ष्मीनगरमध्ये केंद्र शासनाच्या आयुष्यमान भारत या योजनेतून मंजूर झालेल्या निधीतून नागरी आरोग्य वर्धिनी केंद्र पूर्वीच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इमारतीची डागडुजी करण्याचे काम दोन-तीन महिन्यापूर्वी सुरू केले होते. हे काम नुकतेच पूर्ण झाले आहे त्यामुळे नागरी आरोग्य वर्धिनी केंद लवकरात लवकर सुरू करण्यात यावे अशी आमची मागणी आहे. सध्या लक्ष्मीनगर येथील नागरीक ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत आहेत. ग्रामीण रूग्णालय लक्ष्मीनगरपासून तीन ते चार किलोमीटर अंतरावर आहे. इतके अंतर पार करून येथील नागरिकांना ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचार घेणे शक्य होत नाही. लक्ष्मीनगरमध्ये परिसरात प्रभाग १, प्रभाग २, प्रभाग १२, प्रभाग १३ या प्रभागांचा समाविष्ट होतो. या प्रभागात बहुतांश आर्थिकदृष्टया गरीब लोक रहिवाशी आहेत. सध्या खाजगी रुग्णालयाची सेवा महागडी झाली आहे ही सेवा गोरगरीब कुटुंबातील लोकांना घेणे शक्य नाही. म्हणून लक्ष्मीनगरमध्ये प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्ये बांधण्यात आलेले नागरी आरोग्य केंद्र ताबडतोब सुरू करावे ही विनंती.

निवेदन दिल्यानंतर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जाधव म्हणाले, सदर आरोग्य वर्धनी केंद्रामध्ये एम.बी.बी.एस. डॉक्टर व कर्मचारी कार्यरत राहणार या ठिकाणी रक्त, लघवी तपासणी करण्यासाठी लॅब उपलब्ध असणार आहे हे केंद्र आपल्या सेवेत लवकरच सुरू होईल.

यावेळी नगरसेविका स्नेहल आवटे, साहेब युवा मंचचे अध्यक्ष विजय घोरपडे, सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ शिंदे, युवराज जाधव, दशरथ सपकाळ, सनी खरात, अनिल जाधव, नवनाथ भोसले, अर्जुन आवटे, नंदू मदने, पुरुषोत्तम खांडेकर,अक्षय वाघमारे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

या निवेदनाच्या प्रती आ.महेश शिंदे व कोरेगावच्या नगराध्यक्षा दिपाली बर्गे यांनाही देण्यात आल्या आहेत.

# समान संधी, अभिव्यक्ती स्वातंत्र्य देणाऱ्या लोकशाहीचे संवर्धन महत्त्वाचे

## डॉ. सुनील सावंत यांचे प्रतिपादन



**वाई : प्रतिनिधी**

आपल्या घटनाकारांनी लोकशाही ही शासनव्यवस्था स्वीकारून भारताच्या प्रत्येक नागरिकाला समान संधी व अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. अशा लोकशाहीचे आपण संवर्धन करण्यासाठी कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन प्र. प्राचार्य डॉ. सुनील सावंत यांनी केले.

येथील जनता शिक्षण संस्थेच्या किसन वीर महाविद्यालयात लोकशाही पंधरवडा निमित्त, अग्रणी महाविद्यालय योजनेंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लोकशाहीचे महत्व या विषयावरील व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे विज्ञान विभागाचे उपप्राचार्य डॉ ज्ञानदेव झांबरे होते. यावेळी मराठी विभाग प्रमुख व एन. एस. एस. चे सल्लागार डॉ. चंद्रकांत कांबळे, प्रकल्प अधिकारी डॉ संग्राम थोरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

आपल्या व्याख्यानात डॉ. सावंत यांनी लोकशाहीचे महत्त्व विशद करून, हुकुमशाही, साम्यवादी शासनव्यवस्था व लोकशाही यांमधील फरक स्पष्ट केला. प्रसारमाध्यम हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून तो बळकट असणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले..

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना उपप्राचार्य डॉ. झांबरे म्हणाले, लोकशाहीमध्ये मतदार नोंदणी करून कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदान करणे गरजेचे आहे. एन. एस. एस.च्या स्वयंसेवकांनी नोंदणीचे हे काम करून लोकशाही बळकट करण्यासाठी हातभार लावावा असे आवाहन त्यांनी केले.

प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रकल्प अधिकारी डॉ अंबादास सकट यांनी केले. राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. राजेश जायकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा.जयवंत खोत व जितेंद्र चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला एन.एस.एस. चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देगाव आणि पुसेगाव पाणीपुरवठा योजनांचे भूमिपूजन

## पाणीपुरवठा व स्वच्छतामंत्री गुलाबराव पाटील यांची उपस्थिती; शेतीस लवकरच शाश्वत पाणी पुरवठा करणार

**सातारा : प्रतिनिधी**

सातारा व खटाव तालुक्यातील टंचाईग्रस्त गावांमध्ये लवकरच शेतीसाठीही पाण्याची सोय केली जाईल असे प्रतिपादन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. सातारा तालुक्यातील देगांव आणि खटाव तालुक्यातील पुसेगाव येथील जल जीवन मिशन अंतर्गत हर घर जल योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनांचे भूमिपूजन पाणी पुरवठा मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.






यावेळी देगांव सरपंच वैशाली साळुंखे, उपसरपंच मनोज लोणकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधीक्षक अभियंता वैशाली आवटे, कार्यकारी अभियंता पल्लवी मोटे यांच्यासह अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

पुसेगाव येथील कार्यक्रमावेळी एम.जी.पी. च्या अधिकाऱ्यांसह पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना पाणी पुरवठा मंत्री श्री. पाटील म्हणाले, टंचाईग्रस्त गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जल जीवन मिशनच्या माध्यमातून सोडवण्यात आला आहे. लवकरच शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यात येईल. शेतीसाठीही शाश्वत पाणी पुरवठा करण्याची योजना राबवली जाणार आहे. देगाव व पुसेगाव भागात शेतीसाठी धरणांमधील पाणी पोहोचवण्यात येईल.

पुसेगाव येथे १७ कोटी ३९ लक्ष रुपयांची योजना उभारण्यात येत आहे. तर देगांव येथे १३ कोटी ७० लाख रुपयांची योजना उभारण्यात येत आहे.

# इलेसियम क्लब्ससोबत सहयोगाने पुण्यात जगातील अग्रगण्य टेनिस अकॅडमी पीटर बर्वाश इंटरनॅशनलचे उद्घाटन

**पुणे : प्रतिनिधी**

पीटर बर्वाश इंटरनॅशनलने पुण्यात निवडक इलेसियम क्लब्ससोबतच्या सहयोगाची घोषणा केली.

प्रतिष्ठित पीबीआय उपक्रमाने जागतिक दर्जाच्या टॅलेंटला वाव देण्यासाठी जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण सेवा दिल्या आहेत. या सहयोगामुळे पुणेकरांना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त प्रशिक्षकांद्वारे प्रदान केला जाणारा जागतिक स्तरावर प्रसिद्ध टेनिस उपक्रम मिळतो. प्रशिक्षकांना जगभरातील विविध टेनिस संघटनांसाठी विकास धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रँडस्लॅम स्तरावर खेळाचे प्रशिक्षण आयकॉन्सचा विस्तृत अनुभव आहे.

हा उपक्रम तरुणांच्या विकासापासून ते प्रौढ प्रोग्रामिंगपर्यंत सर्व प्रकारच्या व्यक्तींच्या गरजांची पूर्तता करतो. पीबीआय सध्या सहज यमलापल्ली, ऋषी रेड्डी, श्रीवल्ली भामिदिपत्ती यांसारख्या काही खेळाडूंसह भारतीय टेनिसच्या भावी पिढीतील टॅलेंटचे नेतृत्व करत आहे. लिएंडर पेस, अँडी रॉडिक, सांचेझ विकारिओ, अबीगेल स्पीयर्स यांसारखे खेळाडूही पीबीआयशी संलग्न आहेत. रेने झोंडाग (पीबीआय अध्यक्ष), सेझर मोरालेस (पीबीआय इंडिया टेक्निकल डायरेक्टर), मिलोस मिलुनोविक (पीबीआय पुणे टेक्निकल डायरेक्टर) आणि गुरपवित सिंग (संस्थापक, इलेसियम क्लब्स) यांनी या लॉन्चची सह-घोषणा केली.

इलेसियम क्लब्स, बावधन, पुणे अद्वितीय असण्यासह १२.५ एकरहून अधिक जागतिक दर्जाच्या क्रिडा पायाभूत सुविधेवर पसरलेले आहे. यामध्ये यशस्वी पीबीआय उपक्रम राबवण्याकरिता सर्व आवश्यक जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा आहेत, जसे विविध कोर्ट्सपासून प्रशिक्षण सुविधा, स्ट्रेन्थ व कंडिशनिंग सुविधा, स्विमिंग पूल्स, थेरपी, रिकव्हरी रूम्स आणि स्पोर्ट्स सायन्स टीम. पीबीआय व इलेसियम क्लब्सने यापूर्वीच पुण्यातील तीन आणखी इलेसियम क्लब्स स्थानांवर सॉलिटेअर ग्रुपसोबत करार केला आहे आणि मुंबई, सोलापूर व चेन्नईमधील अनेक नवीन क्लब प्रकल्पांमध्ये विस्ताराचा शोध घेत आहेत.

इलेसियम क्लब्स अनेक आंतरराष्ट्रीय अकॅडमी आणि ब्रॅण्ड भागीदारांसोबत काम करतात. इलेसियम पीबीआय, गॅरी कर्स्टन क्रिकेट इंडिया, एफसी बार्सिलोना, रिकी हॅटन (बॉक्सिंग) आणि मायकेल फेल्प्स स्विमिंग सारखे आंतरराष्ट्रीय अकॅडमी ब्रॅण्ड्स, तसेच बॅडमिंटनसाठी पदुकोण स्पोर्ट्स मॅनेजमेंट, चेन्नईयन एफसी, ठाणे सिटी एफसी, पडेल टेनिस फेडरेशन आणि पिकलबॉल असोसिएशन ऑफ इंडिया यांसारख्या अनेक आघाडीच्या भारतीय क्रीडा विकास ब्रॅण्ड्सना होस्ट करते.

इलेसियम क्लब्ससोबतच्या या नवीन सहयोगाबाबत पीबीआयचे अध्यक्ष रेने झोंडाग म्हणाले, ''स्पर्धात्मक क्रीडापटू आणि मनोरंजक खेळाडूंना पीबीआय उपक्रम ऑफर करण्यासाठी आम्ही पुण्यासह एका नवीन भौगोलिक स्थानामध्ये प्रवेश करत आहोत, याचा मला आनंद होत आहे. खेळ लोकांना एकत्र आणतो आणि इलेसियम क्लब्ससोबत या उपक्रमाचा भाग असल्याचा मला अभिमान वाटतो. इलेसियम क्लब्ससोबत सहयोग केल्याने नवीन शहरे आणि दर्जेदार पायाभूत सुविधांसाठी दरवाजे खुले होतात. मी हा सहयोग अधिक बहरताना आणि सर्व वयोगटातील लोकांना लाभदायी परिणाम देताना पाहण्यास अत्यंत उत्सुक आहे.''



**रेने झोंडाग (PBI अध्यक्ष) गुरपवीत सिंग (Ileseum Clubs संस्थापक) यांच्यासमवेत Ileseum Clubs येथे जगातील आघाडीच्या टेनिस अकादमी, Peter Burwash International (PBI) चे उद्घाटन करताना.**

इलेसियम क्लब्सचे संस्थापक गुरपवित सिंग म्हणाले, ''मला आमच्या शिरपेच्यात आणखी एका तुऱ्याची भर करताना अत्यंत आनंद होत आहे. प्रगत टेनिस प्रशिक्षण आणि कार्यशाळा आणण्यासाठी आम्ही भागीदारी करू शकणाऱ्या सर्वोत्तम अकॅडमींपैकी एक पीबीआय आहे. आम्ही आशा करतो की शिक्षण, कार्यशाळा आणि पायाभूत सुविधांचा वाढलेला स्तर भारतातील टेनिस इकोसिस्टमला चालना देण्यासाठी आम्हाला मदत करेल.''

इलेसियम क्लब्स पुढील तीन वर्षांत क्लब केंद्रांमध्ये १० जागतिक दर्जाचे पीबीआय उपक्रम राबवण्याची आणि सहयोगी क्लब्समध्ये अनेक आउटरीच कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आखत आहे. प्राइम लोकेशन्सवर अत्याधुनिक सुविधा देऊन आणि सर्व सुविधांवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवा पुरवून भारतात टेनिस खेळण्याचा आनंद पुन्हा जागृत करण्याचा हेतू आहे.

पीबीआयकडे सध्या २०० हून अधिक विद्यार्थी बेंगळुरूमधील मुख्य उच्च-कार्यक्षमता केंद्रात प्रशिक्षण घेत आहेत. एकट्या जीएलसीमधील इलेसियम क्लब्ससोबत १००० हून अधिक पालक अगोदरपासून संलग्न असताना एक मजबूत इकोसिस्टम आधीच अस्तित्वात आहे. ११/१२ फेब्रुवारी २०२३ रोजी पीबीआय कोचिंग पद्धतीचा अनुभव घेण्यासाठी योजनांमध्ये प्रौढ आणि मुलांसाठी डेमो सत्रांचा समावेश आहे.

**पीबीआय बाबत...**

१९७५ मध्ये स्थापना करण्यात आलेली पीटर बर्वाश इंटरनॅशनल (पीबीआय) ही जगातील प्रमुख टेनिस व्यवस्थापन कंपनी आहे, जी जगभरातील पंचतारांकित रिसॉर्ट्स, हॉटेल्स व टेनिस क्लब्ससाठी टेनिस सूचना, कार्यक्रम विकास, विपणन, ऑपरेशन्स आणि दैनंदिन टेनिस क्रियाकलापांमध्ये विशेषज्ञ आहे. पीबीआयचे संस्थापक पीटर बर्वाश हे ४५ वर्षांहून अधिक काळ टेनिस उद्योगातील हॉल ऑफ फेम आयकॉन म्हणून जगप्रसिद्ध प्रशिक्षक, लेखक, टेनिस टीव्ही समालोचक आणि प्रेरक वक्ता आहेत. नाविन्यपूर्ण टेनिस फॉर लाइफएँ सूचना आणि अपवादात्मक ग्राहक सेवेसाठी ओळखली जाणारी पीबीआय युनायटेड स्टेट्स, मेक्सिको, हवाई, कॅरिबियन, आशिया, मध्य पूर्व आणि युरोपमधील ५५ विशेष मालमत्तांसाठी टेनिस उपक्रमांचे मार्गदर्शन करते. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या : www.pbitennis.com

**इलेसियम क्लब्स बाबत..**

इलेसियम क्लब्स ही एण्ड-टू-एण्ड रिअल इस्टेट सर्विसेस कंपनी आहे, जी जगाला सर्वोत्तम स्थान बनवण्यासोबत त्यामध्ये लोकांना सुसज्ज करण्यावर मिशनवर आहे. आनंदी व आरोग्यदायी समुदायांच्या निर्मितीसाठी क्रीडा व फिटनेस ही कंपनीची साधने आहेत.

गुरपवित सिंग व अमित गोएल यांच्या अभिनव विचारामधून स्थापना करण्यात आलेली इलेसियम क्लब्स जीजीसी, एसपीआर ग्रुप, सॉलिटेअर ग्रुप, द वाधवा ग्रुप इत्यादींसारख्या मोठ्या डेव्हलपर्ससाठी सुविधांच्या जागांवर आरओआय वितरित करते आणि टाऊनशिप मालमत्ता व्यवस्थापनात विशेषीकृत आहे. १४ हून अधिक जागतिक दर्जाचे आंतरराष्ट्रीय अकॅडमी भागीदार व ब्रॅण्ड्स आणि वर्षभरात २०० हून अधिक इव्हेण्ट्स करणाऱ्या इव्हेण्ट्स कॅलेंडरसह इलेसियम क्लब्सचा विस्तार संपूर्ण भारतात ४ सक्रिय क्लब्स आणि १७ क्लब्समध्ये झाला आहे.

# माफी मागा आणि मगच या! कोल्हापुरात राज्यपालांच्या दौऱ्याविरोधात वाढता रोष

## शिवसेनेकडून जेलभरो आंदोलन करत दिला 'चले जाव'चा नारा




**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांना निमंत्रित करण्यात आल्यानंतर रोष दिवसेंदिवस वाढत आहे. शिवसेना ठाकरे गटाकडून आज राज्यपालांच्या दौऱ्याला कडाडून विरोध करत आज जेलभरो आंदोलन केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर शिवसेनेकडून आंदोलन करण्यात आले. शिवाजी विद्यापीठात राज्यपालांना आमंत्रित करू नये, अशी मागणी शिवसेनेनं केली आहे. शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ राज्यपाल कोश्यारी आणि भाजप नेते विनय सहस्त्रबुद्धे यांच्या उपस्थितीत होत आहे.

राज्यपालांनी महाराष्ट्रात आल्यानंतर राज्याचे प्रतीक असलेल्या महापुरुषांवर सातत्याने बेताल वक्तव्ये केल्याने संतप्त भावना आहेत. त्यामुळे राज्यपालांविरोधात शिवसेनेकडून आक्रमक भूमिका घेण्यात आली आहे. ज्या विद्यापीठाचे नाव शिवाजी विद्यापीठ आहे त्या विद्यापीठात अपमान करणाऱ्या राज्यपालांना आमंत्रित करू नये, अशी मागणी शिवसेनेनं केली आहे. कोल्हापुरात आल्यास कार्यक्रम उधळून लावू, असा इशारा शिवसेनेनं दिला आहे.

**माफी मागून कोल्हापुरात या, शिवसेनेची मागणी**

शिवसेना जिल्हाप्रमुख संजय पवार पवार म्हणाले की, राज्यपालांनी पहिल्यांदा माफी मागून मगच कोल्हापुरात यावे. त्यांनी जाणूनबुजून आमच्या दैवतांचा अपमान केला आहे. विद्यापीठाचे नाव शिवाजी विद्यापीठ आहे, त्यामुळे त्यांनी पहिल्यांदा माफी मागावी आणि मग कोल्हापुरात यावे. अशा लोकांना बोलावण्याचे तुम्ही धाडस कसे काय करता? अशी विचारणाही त्यांनी विद्यापीठ प्रशासनाला केली. या राज्यपालांना आमचा विरोध कायम राहणार आहे.

**शिवसेनेकडून कुलगुरुंना निवेदन**

शिवसेनेकडून विविध माध्यमातून राज्यपालांच्या कोल्हापूर दौऱ्याला प्रखर विरोध सुरु आहे. जेलभरो आंदोलन करण्यापूर्वी शिवसेनेकडून शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुंनाही निवेदन देण्यात आलं आहे. शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभास त्यांना निमंत्रित करून विद्यापीठ प्रशासनाने कोल्हापूरच्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळले आहे. ते जनता कदापी सहन करणार नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

**शिवाजी विद्यापीठाचा १६ फेब्रुवारीला दीक्षांत समारंभ**

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या समारंभाला राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि माजी खासदार विनय सहस्त्रबुद्धे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. शनिवारी (ता.०४) झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. यामध्ये व्यवस्थापन परिषदेवरील नूतन सदस्य उपस्थित होते.

# सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य सरकार सर्वोतोपरी मदत करेल; मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'सुमंगलम' पंचमहाभूत लोकोत्सव देशाला दिशा देणारा उत्सव ठरेल, सेंद्रिय शेतीचा अभ्यास करायला जगभरातील संशोधक सिद्धगिरी येतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्र्यांनी काडसिद्धेश्वर महाराजांच्या प्राचीन मंदिरात दर्शन घेवून पाहणीला सुरुवात केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी ६५० एकर परिसरात होणाऱ्या सुमंगलम कार्यक्रम स्थळाला भेट दिली. त्यांनी यावेळी पृथ्वी,जल,अग्नी, वायू आणि आकाश या तत्वांच्या गॅलरी, मुख्य सभा मंडप सोबत सोळा संस्कार, आरोग्य अशा गॅलरीना भेट देवून पाहणी केली. यावेळी त्यांनी सिद्धगिरी गोशाळा, सिद्धगिरी हॉस्पिटल व सिद्धगिरी गुरुकुलमला भेट देत मठाच्या विविध प्रकल्पांची पाहणी केली. त्यांनी मठावर होणाऱ्या लोकोपयोगी प्रकल्पांचे कौतुक केले. सिद्धगिरी गुरुकुलमच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यासमोर प्राचीन १४ विद्या व ६४ कलांचे प्रात्यक्षिक सादर केले. मुख्यमंत्र्यांनी अशा अभिनव शिक्षण पद्धतीची आजच्या पिढीला खरी गरज असल्याचे सांगितले.



मुख्यमंत्री म्हणाले की, मठाने आजपर्यंत आध्यात्मसह कृषी, पारंपरिक शिक्षण, आरोग्य, महिलासबलीकरण, संस्कृती रक्षण, गोसंवर्धन, संशोधन आणि आपत्ती व्यस्थापन अशा अनेक क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. पर्यावरण रक्षणासाठी जगाला दीपस्तंभाप्रमाणे दिशादर्शक होईल असा सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव आयोजित केला आहे. आज पर्यावरणीय हानीच्या अनेक घटना आपण पाहत आहोत. त्सुनामी, अतिवृष्टी, भूकंप, महापूर या सारख्या अनेक समस्याना आज जगाला तोंड द्यावे लागत आहे. यासाठी आपण जागृती करणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून काडसिद्धेश्वर स्वामीजींच्या संकल्पनेनुसार कोल्हापुरातील सिद्धगिरी मठ येथे सुमंगलम् हा पर्यावरणीय लोकोत्सव होत आहे ही आपल्या राज्यासाठी गौरवाची बाब आहे.

या उत्सवाबद्दल बोलताना काडसिद्धेश्वर स्वामी यांनी म्हणाले की, या उत्सवात पारंपरिक सेंद्रिय पद्धतीच्या शेतीचे रोल मॉडेल प्रत्यक्षात पाहता येणार आहे. देशी बियाणे, जैविक खत, जैविक कीड नियंत्रक प्रक्रिया समजून घेता येणार आहेत. त्यामुळे रासायनिक विषमुक्त अन्न-धान्याकडे टाकलेले ते एक समग्र पाऊल ठरेल. तसेच देशात पहिल्यांदाच देशी प्रजातीच्या गाई ,म्हैशी, बकऱ्या, घोडे, गाढव , कुत्रे व मांजर यांचे अनोखे प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे. त्यामुळे देशी जाती प्रजातींचे संगोपन व संवर्धनाची व्याप्ती वाढण्यास मदत होईल. लोकोत्सवात सहभागी होणाऱ्या लोकांना काडसिदेश्वर स्वामी यांनी सोबत एक किलो प्लास्टिक कचरा सोबत आणण्याचे आवाहन केले आहे. येथे गोळा होणाऱ्या कचऱ्यापासून रिसायकलिंग युनिटमधून त्या कचऱ्याचे पुनर्निमिती प्रक्रिया लोकांना पाहता येणार आहे. यामुळे समाजातील युवकांना एक नवीन दिशा निश्चितच मिळू शकते.

# गोकुळच्या दूध विक्री दरात वाढ; संपूर्ण महाराष्ट्रात दर वाढवल्याने ग्राहकांना झटका

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गोकुळकडून दूध विक्री दरात वाढ करण्यात आल्याने ग्राहकांना तगडा झटका बसला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात गोकुळने दुधाचे दर वाढवले आहेत. राजधानी मुंबईत म्हशीच्या दूध दरामध्ये तीन रुपयांची वाढ करण्यात आली आहे, तर गायीच्या दुधात दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता मुंबईत म्हशीच्या दुधाचा दर आधी प्रतिलिटर ६९ रुपये होता तो आता ७२ रुपयांवर पोहोचणार आहे, तर गायीच्या दुधाचा दर ५४ वरून ५६ रुपयांवर प्रति लिटर पोहोचणार आहे. उद्यापासून (१० फेब्रुवारी) नव्या दराची अंमलबजावणी होणार आहे.

कोल्हापुरात म्हशीच्या दुधाचा एक लिटरचा दर ६४ रुपयांवरून ६६ रुपये प्रति लिटर करण्यात आला आहे. गायीचे दूध प्रति लिटर ४८ रुपयावरून ५० रुपये इतके करण्यात आले आहे. पुण्यामध्ये म्हशीच्या दुधात दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे म्हशीचे एक लिटर दुधाचा ७० रुपयावरून ७२ रुपये प्रति लिटर करण्यात आला आहे. गायीचे दूध प्रति लिटर ५६ रुपयांना मिळणार आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पानंतर लगेचच अमूलनेही दुधाच्या दरात लिटरमागे तीन रुपयांनी वाढ केली आहे. दुधाच्या दरात प्रतिलिटर ३ रुपयांनी वाढ केल्याचं निवेदन अमूलने जारी केलं आहे. दुधाचे वाढलेले दर ३ फेब्रुवारीपासूनच लागू झाले आहेत. अमूलचे ताजाचं अर्धा लिटर दूध २७ रुपयांना मिळणार आहे, तर १ लिटर पॅकेटसाठी ५४ रुपये मोजावे लागतील. अमूल गोल्ड अर्थात फुल क्रीम दुधाचे अर्धा किलोचे पॅकेट आता ३३ रुपयांना मिळणार आहे. तर १ लिटरसाठी ६६ रुपये मोजावे लागतील. अमूल गायीच्या एक लिटर दुधाचा दर ५६ रुपयांवर पोहोचला आहे. अर्ध्या लिटरसाठी २८ रुपये मोजावे लागणार आहेत. तर म्हशीचे अ२ दूध आता ७० रुपये प्रतिकिलो दराने उपलब्ध होणार आहे.

दुसरीकडे पुण्यातील कात्रजचं दूध दोन रुपयांनी महागलं आहे. कात्रज दूध संघाकडूनही गाय आणि म्हशीच्या दूध दरात वाढ करण्यात आली आहे. नवीन दरवाढ उद्यापासून म्हणजेच १ फेब्रुवारीपासून लागू होणार आहेत. पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने गायीच्या दुधाच्या खरेदी आणि विक्री दरात प्रतिलिटरला दोन रुपये वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तर म्हशीच्या दूध विक्रीदरात दोन रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असला तरी दरवाढीचा बोजा ग्राहकांना सहन करावा लागणार आहे.

# राहुल कलाटे यांच्यावर १ कोटी १० लाखांचे कर्ज

**पिंपरी : प्रतिनिधी**

चिंचवडची पोटनिवडणूकजाहीर झाल्यापासून राहुल कलाटेंची जोरदार चर्चा सुरु आहे आणि आता त्यांनी बंडखोरी केल्यामुळे राज्यभर चिंचवडची पोटनिवडणूक गाजणार असल्याचं चिन्ह आहे. त्यांच्याविरोधात बॅनरबाजी करण्यात आली आहे शिवाय त्यांची शिवसेनेतून हकालपट्टीदेखील करण्यात येणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहे. ते आता चिंचवडमधून 'शिट्टी' या चिन्हावर चिंचवड काबीज करायला सज्ज झाले आहे. जनता आणि समर्थकांच्या पाठिंब्यामुळे बंडखोरी करतो असं जरी त्यांनी सांगितलं असलं तरीदेखील त्यांच्याकडे निवडणूक लढवण्याइतकं आर्थिक पाठबळ आहे का?, अशा चर्चा आहे. त्यांच्याकडे नेमकी किती संपत्ती आहे? आणि त्यांच्यावर कर्ज किती आहे?, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.



राहुल कलाटे यांच्याकडे ६१ कोटींची संपत्ती आहे. त्यावर १ कोटी १० लाख ७ हजार २४८ रुपयांचे कर्ज आहे. त्यांनी उमेदवारी अर्जासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रातून यासंदर्भात माहिती मिळाली आहे. राहुल कलाटे यांनी वाणिज्य शाखेतून पदवी घेतली आहे. कलाटे कुटुंबाची जंगम मालमत्ता एक कोटी ४० लाख २० हजार ५९३ आहे. कलाटे यांची स्थावर मालमत्ता ६० कोटी तीन लाख ७६ हजार ३१९ रुपये, तर जंगम स्थावर मालमत्ता ६१ कोटी ४३ लाख ९६ हजार ९१२ रुपये आहे. कलाटे यांच्यावर १ कोटी १० लाख ७ हजार २४८ रुपयांचे कर्ज आहे. कलाटे यांनी शेती आणि व्यवसाय हे उत्पन्नाचे साधन दाखवले असून त्यांची पत्नी गृहिणी आहे.

कलाटे यांच्याकडे पुणे जिल्ह्यातील खेड, मुळशी तालुक्यात शेतजमीन आहे, तर रहाटणी, वाकडमध्ये फ्लॅट आहे. कलाटे यांच्याकडे ९२ हजार ६४० रुपये, तर पत्नीकडे ५३ हजार ७५० रुपये रोख आहेत. कलाटे यांच्याकडे १५ तोळे सोने, तर त्यांच्या पत्नीकडे ५२ तोळे सोनं आणि दोन किलो चांदी आहे. कलाटे यांच्याविरुद्ध पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलाटे यांनी २०२२-२३ या आर्थिक वर्षात ५६ लाख ७३ हजार ९४० रुपये उत्पन्न दाखवले आहे, तर त्यांच्या पत्नीचे उत्पन्न ५ लाख ६६ हजार ३३० रुपये आहे.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्याविरोधात कोणीही उमेदवार उभं राहण्याची हिंम्मत दाखवत नसताना २०१९च्या निवडणुकीत राहुल कलाटे हे त्यांच्याविरोधात अपक्ष लढले होते. त्यावेळी त्यांना लाखभर मतं मिळाले होते. त्याच जोरावर यावेळी त्यांनी बंडखोरी करण्याचा निर्णय घेतला आहे.

# युद्ध संपविण्यासाठी मोदी पुतीन यांना राजी करू शकतात : US चा दावा

**न्यूयार्क : वृत्तसंस्था**

रशिया-युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेच्या वतीने मोठे विधान करण्यात आले आहे. अमेरिकेने दावा केला आहे, भारताचे पंतप्रधान मोदी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना रशिया-युक्रेन युद्ध संपवण्यासाठी राजी करू शकतात. व्हाईट हाऊसचे प्रवक्ते जॉन किर्बी यांनी हे वक्तव्य केले आहे. अमेरिका शत्रुत्व संपवण्याच्या कोणत्याही प्रयत्नांचे मनापासून स्वागत करेल.

गेल्या वर्षभरापासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. दरम्यान, हे युद्ध संपवण्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी महत्त्वाची भूमिका बजावू शकतात, असे अमेरिकेच्या वतीने सांगितले जात आहे. इतकेच नाही तर पीएम मोदी पुतिन यांच्याशी बोलून त्यांना युद्ध संपवण्यासाठी राजी करू शकतात असं अमेरिकेने म्हटले.

जेव्हा व्हाईट हाऊसचे प्रवक्ते जॉन किर्बी यांना विचारण्यात आले की, युक्रेन आणि रशियामधील युद्ध थांबवण्यास किंवा राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना पटवून देण्यात पंतप्रधान मोदींना उशीर झाला का? याला उत्तर देताना प्रवक्ते जॉन किर्बी म्हणाले की, युक्रेनमधील युद्ध संपुष्टात आणणाऱ्या अशा कोणत्याही प्रयत्नांचे अमेरिका स्वागत करेल.

व्हाईट हाऊसच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेचे प्रवक्ते जॉन किर्बी म्हणाले की, मला वाटते की पुतीन यांच्याकडे युद्ध थांबवण्यासाठी अजून वेळ आहे. पीएम मोदी पुतीन यांना पटवून देऊ शकतात. हे शत्रुत्व संपवण्याच्या कोणत्याही प्रयत्नाचे अमेरिका स्वागत करेल.

जॉन किर्बी म्हणाले की, युक्रेनियन लोकांसोबत जे काही घडत आहे. त्याला सर्वस्वी व्लादिमीर पुतिन जबाबदार आहेत. ते आता हे थांबवू शकतात. परंतू त्याऐवजी ते ऊर्जा आणि उर्जासंबंधित पायाभूत सुविधांवर क्षेपणास्त्रे डागत आहेत. पुतिन यांना युक्रेनमधील ऊर्जा संसाधने नष्ट करायची आहेत, जेणेकरून युक्रेनमधील लोक आणखी अडचणीत येऊ शकतील.